महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २०० वा | दिनांक : ३०/०५/२०२५ | वार : शुक्रवार

## सीबीआय पथक थेट पासपोर्ट कार्यालयात : अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात पकडले

**मुंबई** : सीबीआयने थेट मुंबई येथील पासपोर्ट कार्यालयात एका अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात अटक केली आहे. पासपोर्ट कार्यालयातील सहाय्यक आणि एका दलालाला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे. बनावट पासपोर्ट बनवल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. कनिष्ठ पारपत्र सहाय्यक अक्षय कुमार मीणा व दलाल भावेश शांतीलाल शहा अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

अक्षय कुमार मीणा हे कनिष्ठ पारपत्र सहाय्यक असून लोवर परळ येथील पारपत्र सहाय्यक केंद्रावर पडताळणी अधिकारी म्हणून काम करत होते. सीबीआयने या दोघांच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, 2023-24 या काळात संबंधित अक्षय कुमार मीणा व खासगी दलाल शहा यांनी संगनमताने कट रचत बनावट कागदपत्रांच्या आधारे पासपोर्ट बनवून देत होते. तसेच पासपोर्ट देण्यासाठी लाच घेत असल्याचा देखील त्यांच्यावर आरोप आहे.

सीबीआयने आरोपींना मुंबईतील विशेष सीबीआय न्यायालयात हजर केले असून 5 दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. आता न्यायालयाच्या आदेशानुसार दोघेही 2 जून 2025 पर्यंत पोलिस कोठडीत असणार आहेत. या प्रकरणाचा अधिक तपास सीबीआय करत आहे.

दरम्यान, राज्यात भ्रष्टाचाराच्या विरोधात मोहीम हाती घेण्यात आली आहे. एसीबीने दोन दिवसांपूर्वीच छत्रपती संभाजीनगरमध्ये थेट निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यावर कारवाई केली असून त्यांनी 5 लाखांची लाच स्वीकारतान अटक केली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील महसूल विभागातील तिघांना लाच घेताना अटक केली आहे.

## या सरकारला केवळ हिंदू-मुस्लिम करता येते, विजय वडेट्टीवारांचा हल्लाबोल



**नागपूर** : महाराष्ट्रात सध्या सर्वत्र पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. तसेच अनेक भागांमध्ये पावसाने विक्राळ रूप धारण करत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. मुंबई पुणे सारख्या जिल्ह्यांना देखील पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर कांग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया देत महायुती सरकारवर टीका केली आहे.

नागपूर येथे माध्यमांशी संवाद साधताना विजय वडेट्टीवार म्हणाले, अद्यापही कोणता मंत्री, नेता, आमदार यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची व्यथा ऐकण्यासाठी वेळ नाही. यांना केवळ राजकारण करायचे आहे. यांना केवळ सत्ता आणि खुर्ची महत्त्वाची आहे. काल मी विखे पाटील पाहिले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी देखील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करायला पाहिजे. अवेळी पाऊस वगैरे हे एनडीआरएफच्या निकषात बसत नाही, मी त्या खात्याचा मंत्री होतो. पण राज्य सरकार म्हणून एचडीआरएफचे निकष आहेत त्याप्रमाणे त्यांनी मदत करण्याची आवश्यकता आहे. केवळ तोंडाला पाने पुसण्याचे काम करू नका. आम्ही हे करतो, ते करतो म्हणत बसू नका. नाहीतर शेतकरी नगरपंचायतीच्या निवडणुकीत तुम्हाला बांधावर गाडल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराच त्यांनी दिला आहे.

पुढे बोलताना विजय वडेट्टवार म्हणाले, थोडी देखील शेतकऱ्यांची कीव नाही यांना. एवढे मोठे संकट आलेले असताना सुद्धा त्यांनंया मदतीची घोषणा नाही. थातुरमातूर पंचनामे केले जात आहेत. धान उत्पादक शेतकरी पूर्ण उद्ध्वस्त झाला आहे. रब्बी पिकाचे सर्व धान अजूनही खरेदी केंद्र सुरू केले नाहीत. त्यांना परवानगी नाही. आम्ही सातत्याने मागणी करत आहोत, पण त्याकडे दुर्लक्ष आहे. काय करत आहे सरकार? कुठे आहे सरकार? काय कळत नाही. आम्हाला सरकारच दिसत नाही. मुंबई एवढी मोठी तुंबली. ज्या मेट्रोचे उद्घाटन झाले होते ते पूर्ण गळत लागले होते. नवीन मेट्रोचे पूर्ण बोगस काम केल्याचे दिसून आले. या सरकारला काहीच दिसत नाही. हे सरकार अस्तित्वात नसल्यासारखी परिस्थिती आहे. हे केवळ हिंदू मुस्लिम करत राहतात आणि जनता गेली खड्ड्यात. याच्या पलीकडे यांना काही देणे-घेणे नाही. हिंदू मुस्लिम करून यांना मते मिळतात.

विजय वडेट्टवार म्हणाले, राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांची केंद्र सरकारने पुन्हा एकदा निराशा केली आहे. दरवर्षी जाहिर होणाऱ्या किमान आधारभूत भावामध्ये धानाला तुटपुंजी 69 रुपयांची वाढ करुन ती 2369 रुपये करण्यात आली आहे. सरासरी 3 हजार रुपयांचा दर अपेक्षित असताना सरकारने मात्र धान उत्पादकांकडे पुन्हा दुर्लक्ष केले आहे. राज्यात 22 जिल्ह्यांमध्ये धानाचे उत्पादन घेतले जाते. त्यातल्यात्यात पूर्व विदर्भातील जिल्ह्यांमध्ये दोन्ही हंगामांमध्ये धानाचे पिक घेतले जाते. मे महिन्यापासूनच धान शेतीच्या तयारीला सुरुवात होते. जमिनीची वखरणी ते प्रत्यक्षात धान कापणीपर्यंत शेतकऱ्यांना येणारा खर्च मोठा असतो. धानाचे उत्पन्न चांगले येईल या अपेक्षेने शेतकरी खर्चही करतो. त्यासाठी विविध बँका आणि सावकारांकडून कर्ज काढतो. परंतु, काही वर्षांपासून हवामानातील बदल, अवकाळी पाऊस, गारपिट आदी कारणांमुळे धानाचे मोठे नुकसान होत आहे. त्या तुलनेत सरकारकडून जाहीर करण्यात आलेली भाववाढ धान उत्पादक शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्यासारखी आहे.

## पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना प्रत्येकी १० हजारांची आर्थिक मदत



**पुणे** : राज्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे पुण्यासह कोकण, मराठवाडा, विदर्भात नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामती विधानसभा मतदारसंघात देखील पावसाने धुमाकूळ घातला आहे. अजित पवार यांनी आज पुन्हा एकदा बारामती मतदारसंघातील नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली. यावेळी ज्यांच्या घरात पावसाचे पाणी शिरले, त्यांना दहा हजार रुपये देणार असल्याची घोषणा अजित पवार यांनी केली आहे.

अजित पवार यांनी आज पुन्हा एकदा बारामती मतदारसंघातील नुकसानग्रस्त भागांना भेट दिली. यावेळी त्यांनी पावसामुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. तसेच गावकऱ्यांशी संवाद साधला. गावकऱ्यांना दिलासा देत त्यांनी लवकरच उपयोजना केल्या जातील, असे आश्वासन देखील दिले. शेतीचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्याचे पंचनामे करावे लागतील. त्याला थोडा वेळ लागू शकतो. मात्र, तात्काळ धान्य देण्यात येत असून ज्यांच्या घरात पाणी गेले त्यांना दहा हजार रुपये देण्यात येणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

यावेळी नागरिकांशी बोलताना अजित पवार म्हणाले की, गावातील नुकसानीचे पंचनामे होत आहेत. मात्र धान्य द्यायला सुरुवात झाली आहे. ज्यांच्या घरात पाणी गेले त्यांना त्यांना दहा हजार रुपये आम्ही देतोय. लवकरच पैसे सोडायला लावतो, असं म्हणत अजित पवार यांनी नुकसानग्रस्त नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. हे दहा हजार रुपये केवळ बारामती तालुक्यात दिले जाणार आहेत की, संपूर्ण राज्यातील नुकसानग्रस्त नागरिकांना दिले जाणार आहेत? याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. मात्र ज्यांच्या घरात पाणी गेले आहे, त्यांना पैसे देण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिंग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० मे २०२५


# एक दिवस गावकऱ्या सोबत (ग्राम दरबार)




**दौलताबाद (प्रा. शिवाजी गायकवाड)** : एक दिवस गावकऱ्या सोबत (ग्राम दरबार)विभागीय आयुक्तालयातील कार्यक्षेत्रात असणाऱ्या गावांमध्ये आगळावेगळा उपक्रम सुरू करण्यात येत आहे. 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' असा हा उपक्रम आहे. या अंतर्गत आठवड्यातील एक दिवस गावकऱ्या सोबत संवाद साधण्यासाठी माळीवाडा गावात ग्राम दरबार दि २८ बुधवार रोजी आयोजित करण्यात आलेशासनाच्या वतीने आयोजित विविध प्रकारच्या योजनेचा सर्वांनी लाभ घ्यावा शेतकरी यांनी फार्मर आय डी बनून घ्यावी काही अडीअडचणी असल्यास संपर्क साधावा समस्यांवर तोडगा काढला जाईल शिवाजी साळुंखे सहायक गटविकास अधिकारी यांनी सांगितलेशासनाच्या योजनांची माहिती : अनेक योजना ग्रामीण विकासासाठी आणि शेतकऱ्यांसाठी घोषित केल्या जातात. मात्र, त्या योजनांची माहिती खोलवर पोहचत नाही. परिणामी बहुतांश लोक या योजनांपासून दूर राहतात. त्यामुळं त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी गेल्यावर सरकारी योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी याचे आयोजन करण्यात आले वेगवेगळे प्रदर्शन ठेवण्यात आले होतेग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात आरोग्य तपासणी करून घेतलीयावेळी NRLM विभाग, पंचायत विभाग, पशुसंवर्धन विभाग, कृषी विभाग,घरकुल विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, समाज कल्याण विभाग ,आरोग्य विभाग यांनी भाग घेतला होता यावेळी शिवाजी साळुंखे सहायक गटविकास अधिकारी,डॉ सावरगाव कर तालुका आरोग्य अधिकारी,सरपंच ज्योती नंदकुमार मुळे, उपसरपंच मनेष गजरे, ग्रामपंचायत अधिकारी जि व्ही हारदे,डॉ वाकोदकर ,डी ए जायभाये विस्तार अधिकारी,रंगनाथ पिसाळ कृषी सहायक अधिकारी,साहेबराव खोळसे कृषी अधिकारी,रामदास पाथरे कृषी अधिकारी,जितेंद्र मगरे,एम जी सोनार,आरती इंगळे,व्ही आर ओव्हळ,मुंगीकर,अपूर्वा गिरमकर,निलोफर बेग,मनिष फुलारे,ग्रामपंचायत सदस्य प्रवीण बर्डे,धमपाल गायकवाड,नंदकुमार मुळे, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या,शेतकरी व ग्रामस्थ यांची प्रमुख उपस्थिती होती

# मराठी भाषा विद्यापीठ अभ्यास मंडळावर माधव राजगुरू



**पुणे** : ज्येष्ठ व्याकरणतज्ज्ञ व प्रसिद्ध भाषा अभ्यासक माधव राजगुरू यांची देशातील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर निवड झाली आहे. राज्य शासनाने सप्टेंबर २०२४ मध्ये मराठी विद्यापीठाची स्थापना रिद्धपूर, अमरावती येथे केली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी ही निवड केली आहे. ज्ञानमित्र माधव राजगुरू हे बालभारतीचे निवृत्त विशेषाधिकारी असून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ते कार्यवाह आहेत. तसेच बाल साहित्यातील आद्य संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे ते अध्यक्ष आहेत. त्यांची २७ पुस्तके प्रकाशित आहेत. त्यातील अनेक पुस्तके भाषा अभ्यास व व्याकरणावर आधारित आहेत. मराठी भाषेची परंपरा व समृद्धी यासाठी विविध माध्यमातून राजगुरू कार्य करत आहेत. राजगुरू यांना राज्यातील विविध नामवंत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी हजारो कार्यशाळा झाल्या आहेत. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था शाखा छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष भास्करराव आर्वीकर, उपाध्यक्ष प्रशांत गौतम, कार्यवाह डॉ. विनोद सिनकर आणि शाखा कार्यकारी मंडळाने माधव राजगुरू यांचे अभिनंदन केले आहे


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.



ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact : 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० मे २०२५


# हज यात्रेकरू हजसाठी रवाना



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** भारता बरोबर जगभरातून हज यात्रेसाठी पवित्र मक्का व मदिना येथे लाखो श्रधालू एकत्रित जमा होत आहे

हज यात्रा जीवनात एकदा तरी येवो अशी प्रत्येक मुस्लिम समाजातील प्रत्येक व्यक्ती ची ही इच्छा असते परंतु प्रत्येक व्यक्ती च्या नशीबी नसते नशिबाने ही यात्रा असते

छत्रपती संभाजी नगर मराठी पत्रकार संघाचेसल्लागार (पत्रकार) बाले खान पठाण हे हज यात्रेसाठी सपत्नीक बुधवार रोजी आपल्या अब्दीमंडी गाव येथून रवाना झाले

त्यांना निरोप देण्यासाठी माजी सरपंच इस्माईल पठाण,पत्रकार संघाचे शेख अमीर,अभय विखणकर,किशोर पाटील,प्राध्यापक शिवाजी गायकवाड,जगणाथ भगत,जावेद शेख,शिवाजी अस्वार,पंकज लकडे ,माजी पोलीस निरीक्षक पठाण सर,सलमान पठाण,शब्बीर पठाण,ग्रामस्थ आदींची उपस्थिती होती


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


# दिवंगत डॉ. संभाजी खराट लिखित 'वैधव्याची समस्या'चे प्रकाशन




**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिनिधीदिवंगत डॉ. संभाजी खराट लिखित 'वैधव्याची समस्या आणि मुक्तीची दिशा' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा एमजीएम विद्यापीठातील आर्यभट्ट हॉलमध्ये थाटात पार पडला. जेष्ठ विचारवंत व एमजीएम विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, जेष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर, स्त्रीप्रश्नाच्या अभ्यासक प्रा. डॉ. मंजुश्री लांडगे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी सत्याशोधक विचारवंत प्रा. सुदाम चिंचाणे होते. यावेळी मंचावार श्रीमती वर्षा संभाजी खराट यांची उपस्थिती होती.डॉ. प्रल्हाद लुलेकर पुस्तकावर भाष्य करताना म्हणाले, पुरुष माणूस आहे तशी स्त्री देखील माणूस आहे. समाज स्त्रियांना आज माणूस मानायला तयार नाही, अशी खंत व्यक्त करून ते म्हणाले, डॉ. खराट यांनी त्यांच्या ग्रंथात स्त्रियांसंबंधी जाचक प्रथा आणि त्यांच्या मुक्तीच्या दिशांच्या अनुषंगाने सखोल अभ्यास करून स्त्रियांच्या मूलभूत प्रश्नांना हात घातला आहे. स्त्रिया कुठे कुठे गुलाम आहेत आणि त्यांना गुलाम कसे केले जाते, याची सविस्तर मांडणी आहे. त्यामुळे हे पुस्तक अत्यंत महत्त्वपूर्ण झाले आहे. आपण सर्वांनी स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा. याबाबत वारंवार चिंतन होणे आवश्यक असल्याचे डॉ. लुलेकर म्हणाले. डॉ. सुधीर गव्हाणे भाष्य करताना म्हणाले, पुरुष बदलला की समाज बदलतो. भारतीय संविधानामुळे स्त्रियांना समान अधिकार आहेत. भारतात स्त्रियांच्या समानतेची एक परंपरा आहे. चार्वाक पासून ते आज डॉ. संभाजी खराट यांच्यापर्यंत ती दिसून येते. आज अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात होतोय. समानतेसह स्त्रियांच्या अधिकारातही अडचणी निर्माण केल्या जात आहेत. समाजव्यवस्था आजारी पडली आहे. स्त्रियांवर पुन्हा नवगुलामी लादण्याचे काम सुरू आहे. तिला सौंदर्याच्या पिंजऱ्यात अडकवण्याचा प्रयत्न केला जात आहे म्हणून आपण महात्मा फुले यांच्यासारखे स्पष्ट आणि परखडपणे बोलले पाहिजे. सर्वांनी विकत घेऊन वाचला पाहिजे आणि इतरांनाही भेट देण्याचे आवाहन डॉ. गव्हाणे यांनी केले. एमजीएम विद्यापीठातील स्त्री व लिंगभाव अभ्यास आंतरविद्या अभ्यास शाखा विभागाच्या प्रा. डॉ. मंजुश्री लांडगे पुस्तकावर भाष्य करताना म्हणाल्या, स्त्रियांना जाचक ठरणाऱ्या अनिष्ट प्रथांमुळे त्यांच्या जगण्यावर बंधने येतात. जात, धर्म व संस्कृतीच्या नावाखाली स्त्रियांचे शोषण सुरू आहे. केवळ भारतातच नाही तर जगभरात हे चालू आहे. लग्नानंतर सौभाग्य अलंकाराचा संबंध पुरुषाच्या दीर्घायुष्याशी जोडला जातो, पण लग्नाअगोदरही यातील बहुतांश अलंकार मुली परिधान करतातच की. पतीच्या निधनानंतर मात्र सगळ्या सौभाग्यलंकाराचा त्याग करावा लागतो. या अशा सर्व प्रथा परंपराकडे चिकित्सकपणे पाहणे गरजेचे आहे, असे डॉ. लांडगे म्हणाल्या. अध्यक्षीय समारोप करताना सत्यशोधक विचारवंत प्रा. सुदाम चिंचाणे म्हणाले, डॉ. संभाजी खराट हे कर्ते सुधारक होते. त्यांनी प्रशासनात राहुनही सत्यशोधक चळवळीसाठी योगदान दिले. अत्यंत संवेदनशील मनाच्या या माणसाने अनेक ग्रंथ लिहिले. डॉ. खराट यांचे पुस्तक सत्यशोधक चळवळीचा महत्त्वपूर्ण दस्तऐवज ठरणार आहे. प्रारंभी डॉ. खराट यांचे स्नेही पी. ए. सत्वधर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर गायकवाड यांनी, तर संताजी खराट यांनी आभार मानले. यावेळी खराट यांचे वडील शिवाजी खराट, सासरे एस. बी. टाकळखेडे, अनिल टाकळखेडे, कल्पना टाकळखेडे, डॉ. शेषराव पठाडे, डॉ. गणी पटेल, माजी उपजिल्हाधिकारी भाऊसाहेब जाधव, डॉ. नवनाथ गोरे, सरस्वती हारकळ, अनिता देवतकर, मीरा बनकर, स्वप्नील खराट, दीपाक्षी चिंचाणे, सुजय खराट आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये सत्यशोधक डॉ. संभाजी खराट मित्रमंडळ, सर्व परिवर्तनवादी संघटना आणि ग्रंथाली प्रकाशन यांचे सहकार्य लाभले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० मे २०२५


## विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा गौरव करत 'करिअर कौन्सलिंग व मार्गदर्शन' कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** रोटरी क्लब मुरूम सिटी, रोटरी क्लब कोपरगाव सेंट्रल व संजिवनी विद्यापीठ कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व करिअर मार्गदर्शन कार्यक्रम दि. २९ मे २०२५ रोजी प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटे. कमलाकर मोटे (अध्यक्ष, रोटरी क्लब मुरूम सिटी) होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. प्रा. राम हजारे (सहायक अधिव्याख्याता, संजीवनी विद्यापीठ कोपरगाव) आणि प्राचार्य डॉ. संजय अस्वले (छ. शिवाजी महाविद्यालय, उमरगा) यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना करिअर निवडीतील योग्य दिशा, अभ्यासाचे नियोजन व उद्योगक्षेत्रातील संधी यांबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थितीत रोटे. सुनील राठोड (सचिव, रोटरी क्लब मुरूम सिटी), रोटे. उल्हास घुरघुरे (उपप्राचार्य, प्रतिभा निकेतन कनिष्ठ महाविद्यालय) व मा. प्रा. डॉ. रोटे आप्पासाहेब सूर्यवंशी (नवीन अध्यक्ष, रोटरी क्लब मुरूम सिटी २०२५-२६) प्रा शुभम गिरी संजीवनी विद्यापीठ कोपरगाव यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. मान्यवरांच्या हस्ते ही पवित्र सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटे. संतोष कांबळे यांनी ओघवत्या व प्रभावी शैलीत केले, तर आभार प्रदर्शन रोटे. सुनील राठोड यांनी केले.या कार्यक्रमात मुरूम शहर , बेळंब, आष्टा कासार, नाईकनगर येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत विविध शैक्षणिक क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व स्मृतिचिन्हे देण्यात आली. मुरूम चे भूमिपुत्र गिरीश अष्टगी यांनी माऊंट एव्हरेस्ट शिखर पार यशस्वी पार केल्याबद्दल गौरविण्यात आले त्यांनी आपले चित्तथरारक अनिभाव कथन केले.रोटरीच्या "सेवा हेच आमचे ध्येय" या तत्त्वानुसार समाजोपयोगी उपक्रमांतून तरुणांना योग्य मार्गदर्शन करणे हेच या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. यासाठी रोटरी क्लब मुरूम सिटीतील सदस्य रोटे कल्लाप्पा पाटील, रोटे डॉ आप्पासाहेब सूर्यवंशी, रोटे राजेंद्र वाकडे, रोटे भूषण पाताळे , रोटे मल्लिकार्जुन बदोले, रोटे उल्हास घुरघुरे, रोटे संतोष कांबळे, रोटे डॉ सुवर्णा पाटील , रोटे कल्लाय्या स्वामी, रोटे, प्रकाश रोडगे आदींनी केलेले योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे.

## पाकिस्तानला पुरवली भारताची गोपनीय माहिती : ठाण्यातून गद्दाराला अटक

**ठाणे** : महाराष्ट्रातील दहशतवाद विरोधी पथकाने पाकिस्तानी तपास यंत्रणांना भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्राची गोपनीय माहिती दिल्याप्रकरणी एका व्यक्तीला ठाण्यातून अटक केली आहे. देशाच्या या गद्दाराची चौकशी केली असता असे समजले की हा आरोपी पाकिस्तान इंटेलिजेंस ऑपरेटिव्हच्या नोव्हेंबर 2024 पासून संपर्कात होता. फेसबुकच्या माध्यमातून हा संपर्क होता.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रविंद्र मुरलीधर वर्मा असे असून तो 25 वर्षांचा आहे. संरक्षण दलात छोट्या पदावर हा कार्यरत होता अशी माहिती आहे. याला अटक केल्यानंतर याची कसून चौकशी सुरू आहे. संबंधित आरोपी हा मूळचा ठाण्याचा असल्याचे समजते. भारताने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्राची गोपनीय माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानला पुरवल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. तसेच आता रविंद्र वर्मा याने देशाशी गद्दारी का केली? पैशांसाठी केली की याला देखील हनीट्रॅपच्या माध्यमातून आमिष दाखवण्यात आले, याचा तपास एटीएस अधिकारी करत आहेत.

दरम्यान, देशाची गोपनीय माहिती पाकिस्तानला पुरवल्याप्रकरणी एटीएस पथकाने संबंधित व्यक्तीसह तो संपर्कात असलेल्या पाकिस्तान इंटेलिजेंस ऑपरेटिव्हच्या दोन व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एटीएसने कलम 3(1), ब, 5(अ), भारतीय न्यायसंहिता 2023 चे कलम 61(2) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली होती. या हल्ल्याला ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय सैन्याने जोरदार प्रत्युत्तर दिले. परंतु या नंतर देशात अनेक गद्दार असल्याचे समोर आले. हरयाणातील ज्योती मल्होत्रा या सोशल मीडिया एन्फ्लुअर्सलाही अटक करण्यात आली आहे. होय, आम्ही पाकिस्तानला संवेदनशील माहिती पुरवल्याची कबुली ज्योतीने तपासादरम्यान दिली. त्यामुळे आता ज्योती मल्होत्राच्या अडचणीत वाढ होणार आहे. याबाबत अद्याप पोलिसांकडून अधिकृत सांगण्यात आले नसून वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तावरुन ही माहिती समोर आली आहे. त्यातच, आता ठाण्यातून आणखी एका देशाच्या गद्दाराला अटक करण्यात आली आहे. त्यामुळे देशात अजून किती गद्दार आहेत असा प्रश्न उपस्थित झाला आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ३० मे २०२५

# कोंबडखुळ : अस्सल भन्नाट विनोदी कथा




*पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना कादवा शिवारचे सर्वेसर्वा शिध्द्हस्त कवी कथाकार, साक्षेपी संपादक विजयकुमार मिठे यांचा 'कोंबडखुळ' हा भन्नाट विनोदी कथासंग्रह वाचला.यातील अतिशय अनोख्या विनोदी शैलीच्या कथा अफलातून आहेत. विनोदी कथातंत्र हे अतिशय बोली शैलीने समृद्ध तर आहेच पण बेरकी पात्र, आणि त्यांच्या लकबी,गाव खेड्यातील ग्रामीण साजन सखीचे सौंदर्य वर्णन अनोखे आहे. विनोदी कथा भरकटत जात नाही ती गावं माणसांच्या मनातल्या झोंबी,काही गोमीसांगते.खुळी,बावळी,नादखुळी
अफलातून करामती माणसं आणि लकबी हा संकेत घेऊन विनोदी कथा येते.विनोदी कथेची तंत्रशुद्धता म्हणजे कथानक हा मुळ आत्मा आहे.ते कथा शिर्षकच ठामपणे सांगते.त्यातली पात्र ही संकल्पना सर्वत्र वेगवेगळ्या ढंगाची,रंगाची,बोली शैलीने ती पात्र खुमासदार शैलीत रंगवणं ही अनुभूती लेखक चंद्रकांत महामिने असावा लागतो. १९७२ पासून कथा कविता लेखन करणारे विजयकुमार मिठे यांनी मोजकीच विनोदी कथा अस्सल ग्रामीण शैलीत लिहिली आहे.नाहीतर कथानकाची मिरासदारी करणारे दमा होऊन गेले. कोंबडी पळाली तंगडी धरून (जत्रा)या मराठी चित्रपटातील मिलिंद शिंदे यांनी गायलेलं लोकगीत लोकप्रिय झाले.वाजंत्री पण नाचणारी अवलिया पोरं ही तयार झाली.खरीमुरीची कोंबडी हातात घेऊनच नवरदेवाच्या घोड्या म्होरं नाचायचं.तरचं गावाची शान."मिरवणूक पायाजवळ येताच नाचणाऱ्या दोस्ताकडे पाहून गेल्या चिंगारला.टेंम्पोवर चढून त्यांने फाटकाची कडी काढून टेंम्पोचं बंद केलेलं मागचं फाटक उघडलं आणि एकामागोमाग एक अशा कोंबड्या फाटका बाहेर पळू लागल्या.दगड्या,चांद्या,नांद्या, यांनी दोन्ही बगलात कोंबड्या धरल्या.गज्यांन टेंम्पोवरुन उडी मारुन घोळक्यातल्या दोन कोंबड्या पकडल्या.दोन्ही हातात दोन कोंबड्या उंच धरून त्यांने कोंबडी सारखी मान तुकवून नाचण्याचा पवित्रा घेतला.आणि श्रीहरीकडे पाहून मोठ्याने ओरडला.'बजाव रे बजाव, हेय कोंबरी पलाली,दित भर उलाली' श्रीहरीनं गाणं वाजवताच एकच झुंबड उडाली.प्रत्येकजन हातातला लागले ती कोंबडी धरून नाचू लागला.ज्यांना नाचायला भाव लागत होता ते आणि ज्यांना नाचत येतं नव्हतं तेही वाकडे तिकडे पाय टाकीत कोंबडी घेऊन गाण्यावर नाचू लागले.एकदा दोनदा चारदा नव्हे तर तब्बल पंधरा वेळा श्रीहरीला "कोंबडी पळाली तंगडी धरून"गाणं वाजवावं लागलं.मोजकी मंडळी सोडली तर आख्खी चोरवाडी कोंबडी पळाली गाण्यावर झिंग आल्यागत नाचत होती.टेंम्पोत एकही कोंबडी उरली नव्हती "पुढे काय झाले या साठी हा विनोदी कथासंग्रह वाचलाच पाहिजे..विजयकुमार मिठे यांनी अतिशय उत्तम आशय संपन्न सृजन लय लक्षवेधी करून या कथा भन्नाट रंगवल्या आहेत.यात कथा बीज हे अतिशय वेगळ्या रंगाढंगाचे आहेत.गावात अनेक खुळ घेऊन जगणारी माणसं असतात.ती माणसं माणुसकीने जोपासली जातात.कोंबडखुळ,इगत,खोडा,फु$$स,वा खा या पाच कथांनी तत्कालीन गावगाडा शतकानंतर कसा होता.ती माणसं माणुसकीने प्रेमाने आपुलकीने जगणारी होती.जात धर्म पंथ या पलीकडे आपल्या गावगाड्यात आणि वाड्या वस्त्यात इमान घेऊन जगणारी खरी सत्यवान माणूस होती.शिक्षण आलं आणि माणसं माणुसकीने बिथरली.भाबडी माणसं कष्टकरी माय मातीशी नाळ नातं असलेली माणसं या कथेत दमदारपणे भेटतात ही कथा अस्सल बोली शैलीने मनमुग्ध करते.कथा रंगवून दंगवून वाचकाला खिळवून ठेवते.विनोदी साहित्य सम्राट चंद्रकांत महामिने यांच्या कथेचा संस्कार शिदोरी घेऊन ही विनोदी कथा अतिशय भक्कम भन्नाट झाले आहे.द.मा.मिरासदार,शंकर पाटील रा.रं बोराडे व.बा.बोधे,यांची ग्रामीण कथा ही जशी अस्सल आहे तशीच कादावा शिवाराची बोली शैलीने समृद्ध विनोदी कथा विजयकुमार मिठे यांची आहे.इगत म्हणजे आयडिया,गंमत,कल्पक खेळ. खेकड्याची नांगी मुर्गळावी तशी गावाचा फुगीर तलाठी याची मस्ती जिरवल्याची गोष्ट.या तलाठ्यानंलहान मोठ्याचा कधी मानमरातब ठिवला नाही.गावातल्याशेतसारा अन् सातबारा उतारा याच्या अवाच्या सव्वा पैसे घेऊन लोकांना हैराण केलं.काभू कोतवाल बी त्याला साथ देतं होता.तलाठी भलता मग्रूर फुगीर दाम्या झ्याट कुणाची बी गय करीत नव्हता.कायद्याचा धाक दाखवून लोकांना धमक्या हानायचा.रामु पांगा सांगू लागला आठ पंधरा दिवस म्या तलाठ्याच्या पाळतीवर होतो.त्यांन एक नर्स पटवली होती तीला त्यो बसस्थानकात रोज आपल्या मोटरसायकलवर नेऊन सोडायचा.रामू पांगानं तलाठ्याचंघर शोधलं त्याच्या बायकोला हे सारं कारस्थान सांगितलंचला रंगेहाथ पकडू. बसस्टँडवर तलाठी अन् नर्स बाई गुलूगूलू बोलत होते.तलाठ्याच्या बायकोने चप्पलाखाली नवरा असा झोडपून काढला.साऱ्या पब्लिकनं तलाठी कसा मार खातोय हे सायना संगीत पाहिलं "मार खाये सय्या हमारा..म्हणत नर्स पळून गेली.रामु पांग्यानं मध्यस्तीकरीत हा गुंबळा सोडविला.तलाठ्याचं नाकं ठेसलं ही सारी इगत रामू पांग्यान केली.साऱ्या ऱ्हाळात आवाई गेली..ही कथा प्रचंड दमदार विनोदी आशय घेऊन आलेली.वाचकांनी ती वाचलीच पाहिजे.यातील विनोदी संवाद अतिशय मर्मग्राही आस्वाद देऊन जातात.खोडा म्हणजे आडकाठी, काहीतरी विघ्न येणं संकट येणं.या आशयाचा ख्वाडा मराठी चित्रपट आला.या खोडा कथेचा विनोदी बाज अतिशय वेगळा आहे.परक्या बाईच्या नादाला लागू नये म्हणून एका जहाबाज बाईन केलेली आयडिया म्हणजे खोडा.गावातीलच एक अतिशय रुपवती बाई मंजुळा ती नवरा बाहिर गावी गेला की तुम्ही रातीच घरी या तसा रामड्या चकळतो.आपल्या बायकोला खोटं सांगून रात्री गव्हाला पाणी द्यायच आहे.किर्र रात्री रामड्या मंजुळाच्या घरीत येतो अंधार असतो.तिथं कमळाच्या मिठीत रामड्या असतो ती त्याचीच बायको.तितक्यात लाईट येते.मंजुळा व तिचा नवरा.एका बांडगूळाची खोड मोडण्यासाठी हा डाव रचते हा 'खोडा' रामड्याचा रगडा करते.त्याचे डोळे उघडता.'परस्त्री माते समान ज्यान'नाहीतर खोडा मोडील खानदानी वान'अशी भन्नाट विनोदी कथा रंगवली आहे.यातील वर्णन मनस्वी आनंद देणारे आहे.फुस्स ही कथा अतिशय भक्कम आशय असलेलीगावात चोरीच्या घटना घडता आहेत.गावं चोरांने बेजार झाले आहे.सरपंच पोलिस पाटील आणि गावातील सर्व लोक मिंटीग घेतात चोराचा बंदोबस्त केलाच पाहिजे.आळी बोळीतील सर्व जातीच्या आळीने रोज रात्री दहा बारा लोकांनी रातभर जागून फेऱ्या मारून जाग्रण करायचं.गावदरीत हगनदारीत गावकुसाबाहेर चोर लपून बसतेत.सारं गावं आर्बळल्यांनी करतं.पण एक दिवस उसात चोर लपून बसलेत अशी आवई उठते.उसात चोरांनी धुपन केलं.नक्की ऊसात चोर लपून बसलेत.इकडे पोलिस पाटील, यांच्या शुभहस्ते नारळ फोडून चोर पकडले की त्याची गाढवरून धिंड काढायची.चोर तार लावून पकडायचा का करंट सोडून.पोलीस पाटील बंदुकेच्या गोळीने जायबंदी करू.शेवटी उस पेटवून देऊअशी हुकमत काढली.उस पेटला उभा ऊस ढणाढणा पेटत होता. पोलीस पाटील बंदुक रोखून गोळी झाडणार तसं पोलीस पाटलांचं पोरगंच अंडे भाजून खायला उसात जाळ करत होतं.फुसका बारं झाला. गावातली लोकं खाली माना घालून आप आपल्या घरी गेले.गावगाड्यातल्या अस्सल मराठमोळ्या ग्रामीण विनोदी कथेचा बाज कायम वेगळ्या ढंगात मिठे यांनी दिला आहे.या कथासंग्रहातील अतिशय नवा ट्रेण्ड घेऊन खुमासदार शैलीत कथा येते ती म्हणजे साळून काढने, तासून काढने,खनपुटून काढणे,वाक निट करणे,'वाखा' उखळ पांढरं करणे,पितळ उघडं करणे या अर्थाने ही कथा वाचकाला खिळवून ठेवते.या कथेतील नायिका सखा कुणब्यांची नयतारणी लेक तारा ही प्रचंड रूपवती.साऱ्या गावभर हुंदाडणारी, गावातील पारावरच्या म्हाताऱ्या पासून नयतारण्या पोरांना ताराच यड लागलेलं पोरं तिचा पिच्छा सोडत नव्हते.बशीरच्या दुकानांवर तारा येते बशीर तिला डिवचतो.ती बशीरला कवीची किंमत देतं नाही आपल्या औकातीत राह्यचं.बशीर चवताळतो.तारालाराजाराम पहिलवान आवडत असतो.ती त्याला एकांतात नदीवर भेटते तो तिला टाळते.मी तालिम करणारा गडीअसा पोरीच्या नांदी लागलो तर लोक तोंडात शेन घालतील.पण तारा जिद्दीला पेटते.तुही बदनामी करील.अरे मी जीवापाड तुझ्यावर प्रेम करते.चल उद्या भेटू तुझ्या गोठ्यात.राजराम तारा गोठ्यात आहेत ही आवाई बशीऱ्याला कळते तसा बशीर गोठ्यातची बाहेरून कडी लावून पोलीस पाटलाचं घर गाठूतो.पोलीस पाटलांचं डोकं आऊट होतं.हे खरं आहे का? जर खोटं निघलं तर मी मिशी काढून साऱ्या गावा म्होरं मही धिंड काढा.तसंसारं गावं तारा अन् राजारामचं झंगट पाह्यला जमलं.पोलीस पाटील,संरपच यांनी गोठ्याचं दारं ठोठावलं.राजारामनं अंग पुशीत दार उघडलं.बशीऱ्यानं साऱ्या गोठ्यात धुंडाळलं.तारा कुठं दिसना..तसा बशीऱ्यासाऱ्या गावानं तिथं असा कुचलून काल्ढा की,इवळत बसला.राजारामने ताराला डालग्या खाली लपून ठेवलं होतं.सारं गावं पांगल तशी तारा वाडग्यातून बाहेर आली अन् बशीऱ्याकडं पाहून थुकली.वासा तासून सरळ करावा तसा बशीऱ्याचाच वाखा झाला होता..विजयकुमार मिठे यांची ही विनोदी कथा अतिशय भक्कम आशय संपन्न झाली आहे.कोंबडखुळ या विनोदी कथासंग्रहांने अतिशय भक्कम ग्रामीण विश्वाचा रंगढंग करणारा उलगडा या विनोदी कथेने दिला आहे.याची दखल वाचकांनी घेतली पाहिजे.विनोदी वाड्मयीन अधिष्ठान प्राप्त करून देणाऱ्या या अस्सल रांगड्या बाजाच्या सर्वात्तम कथा आहेत.साहित्यज्योत अशीच अखंड तेवत राहो ही सदिच्छा.

**कोंबडखुळ:-विनोदी कथासंग्रह**
**लेखक - विजयकुमार मिठे,**
***प्रकाशक:-कादवा शिवार प्रकाशन, नाशिक**
***प्रथमावृती:-११सप्टेंबर२०२४**
***मुखपृष्ठ:-ज्ञानेश बेलेकर**
***किंमत:-१५०**
***पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके**
**जालना संवाद:-९९ ७५ १३ ७३ ३७**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002